# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२७१६/१३७९ दि. १५ जून,२०१६

## परिपत्रक

**विषयः- कृषी पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन ७/१२ उतारे ग्राह्य धरण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका व पदवी अभ्यासक्रमाची सन २०१६-१७ हया शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत व मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे यांच्याद्वारे राबविण्यात येत आहे. पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेनुसार सन २०१४-१५ किंवा २०१५-१६ या कालावधीतील शेतजमिनीचा ७/१२ उतारा प्रवेश अर्जासोबत जोडल्यास उमेदवारास १२ गुणांचा अधिभार देण्यात येतो. तथापि, सध्या राज्यात ७/१२ उतारे ऑनलाईनद्वारे उपलब्ध होत आहेत. यामुळे काही भागातून तलाठयांची स्वाक्षरी असलेले ७/१२ उतारे उमेदवारांना प्राप्त होत नाहीत. तर बऱ्याच प्रकरणी ऑनलाईन ७/१२ उताऱ्यामध्ये वर्ष नमूद करण्यात आलेले नसते. यामुळे प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे ७/१२ उतारे प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

उमेदवारांना त्यांच्याकडे असलेल्या शेत जमिनीचा अधिभार मिळण्याच्या दृष्टिकोनातून तसेच ऑनलाईन ७/१२ उताऱ्यामध्ये वर्ष नमूद नसल्याने या परिपत्रकाद्वारे संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येते की, प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्याच्या तारखेपासून प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या तारखेपर्यंत download केलेले ऑनलाईन ७/१२ उतारे अधिभाराकरिता ग्राह्य धरण्यात येत आहेत.

स्वाक्षरीत/-

**महासंचालक**

प्रति,

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
   यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त सर्व विद्यालये / महाविद्यालयांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून योग्य ती कार्यवाही करावी.
२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८
   यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी परिपत्रकानुसार ७/१२ उतारे ग्राह्य धरून अधिभार देण्याची कार्यवाही करावी.
३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.